**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०८/२०१६-१७/८५ दिनांक: १४-०७-२०१६

**आदेश**
**आदेश केस क्र. ०८/२०१६-२०१७**

| | |
|---|---|
| श्री दत्तप्रकाश दिनकरराव पाटील,<br>मु. पो. करंजवडे, ता. वाळवा ,<br>जिल्हा सांगली-४१६ ४०१ | **तक्रारदार**<br>**अर्जदार** |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इस्लामपूर<br><br>३) उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय, इस्लामपूर-२ | **विरुध्द**<br>**पक्षकार** |

**कोरमः-** १. श्री वि. श. गुळवणी, अध्यक्ष
२. श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी, अध्यक्ष ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार दत्तप्रकाश दिनकरराव पाटील, रा. करंजवडे ता. वाळवा, जि. सांगली, यांनी नवीन शेती पंप विद्युत पुरवठयाकरिता (दि. १२-०५-२०१५ ) रोजी विज वितरण कंपनीकडे कोटेशन भरले आहे. परंतु त्यांना विद्युत पुरवठा देणत आलेला नाही. त्यांनी बॅकेचे कर्ज काढून १७,००० फूट पाईप लाईन केली आहे. तक्रारदार असे नमूद करतात की, त्यांच्या ऊस व शाळू पिंकाचे नुकसान झाले आहे. त्यांना मा. विद्युत नियामक आयोगाच्या नियमाप्रमाणे मुदतीत विद्युत पुरवठा दिलेला नाही. सबब विद्युत पुरवठा सत्वर मिळून पिकांच्या नुकसानीबद्‌दल पाच लाख रुपये नुकसान भरपाई मिळणेबद्दल त्यांनी विनंती केली आहे. सदर तक्रार त्यांनी दिनांक २०-०५-२०१६ रोजी या मंचाकडे दाखल करणेत आली आहे.

२) तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली होती. (त्यामध्ये नुकसान भरपाई वसूल होऊन मिळणेची मागणी केली नव्हती) सदर कक्षाने दिनांक ०६-०४-२०१६ च्या आदेशाने, तक्रारदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे विद्युत पुरवठा देण्यात येईल असे कळविले.

३) वितरण कंपनीतर्फे दि. ०४-०६-२०१६ रोजी लेखी निवेदन दाखल कले आहे. त्यांचे निवेदन असे आहे की, तक्रारदाराचे जेष्ठता यादीमध्ये अ.क्र. ३१६ ला नाव आहे. त्यांना विद्युत पुरवठा देणेसाठी ०.३० कि.मी. लघुदाब विद्युत वाहिनी लागणार आहे. सध्या शेतीपंप विद्युत पुरवठा देणेसाठी योजना/निधी उपलब्ध नाही. इन्फ्रा-२ अंतर्गत भारत इलेक्ट्रीकल्स यांनी दि. २६-०२-२०१३ पर्यन्तची शेती पंपाची कामे पूर्ण केली आहेत. वि.प. तर्फे असे निवेदन केले आहे की, जर तक्रारदारास प्राधान्याने विद्युत पुरवठा दिला तर इतर प्रलंबित ग्राहकंावर अन्याय होणार आहे.

४) सदर प्रकरणाची सुनावणी या मंचासमोर दिनांक ०८-०७-२०१६ रोजी घेणेत आली.त्यावेळी तक्रारदारतर्फे श्री आनंदराव शिंदे, यांनी म्हणणे मांडले . वि.प.तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री देवदास कोरडे यांनी निवेदन केले.

तक्रारदारतर्फे असा युक्तिवाद करणेत आल आहे की, तक्रारदार यांनी दि. १२-०५-२०१५ रोजी शेती पंपाच्या विद्युत पुरवठा मिळणेसाठी पैसे भरले असून त्यांना तीन महिन्याचे मुदतीत विद्युंत पुरवठा केला नाही. तक्रारदार यांनी दिनांक २८-१२-२०१५ रोजी बॅकेकडून कर्ज घेऊन मोठया प्रमाणात पाईप लाईन केली आहे. विद्युत पुरवठया अभावी त्यांच्या पिकांचे नुकसान झाले होते. वि.प.तर्फे केव्हा विद्युत पुरवठा देणेत येईल हे सुध्दा कळविणेत आले नाही. तक्रारदार यांना विद्युत पुरवठा देण्यासाठी रोहित्र (ट्रान्सफॉर्मर ) केवळ १०० फूट अंतरावर उपलब्ध आहे. लवकरात लवकर विद्युत पुरवठा द्यावा असे कथन केले आहे.

वि.प. तर्फे श्री कोरडे यांनी निवेदन दिले की ३०० मिटर लघुदाब वाहिनीची आवश्यकता आहे. जेष्ठता यादीत तक्रारदार यांचा ३१६ वा क्रमांक आहे. इन्फ्रा-२ मधून कामे चालू असून दिनांक २६-०२-२०१३ अखेर पर्यन्तच्या विद्युत ग्राहकांना विद्युत पुरवठा दिलेला आहे.

५) वरील सर्व वस्तुस्थिती व विवेचनावरुन या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

(अ) तक्रारदार हे नियमानुसार व त्यांनी मागणी केल्याप्रमाणे विद्युत पुरवठा मिळणेस पात्र आहेत काय?
उत्तरः- होय.

(ब) कोणता अंतिम आदेश?
उत्तरः- खालील प्रमाणे

## कारणमिमांसा

६) उपलब्ध कागदपत्रे व तोंडी युक्तिवादाचा विचार करता असे दिसून येते की, मा. विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार वितरण कंपनीने निश्चित मुदतीमध्ये तक्रारदार यांना शेती पंपासाठी विद्युत पुरवठा दिलेला नाही. सदरच्या विद्युत पुरवठयासाठी ३००मिटरची लघुदाब वाहिनी जरुरीची आहे ही बाब फार मोठया स्वरुपाची नाही. विद्युत पुरवठा लवकर मिळेल या अपेक्षेने तक्रारदार यांनी बॅकेचे कर्ज काढून पाईप लाईन घातली आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

७) वि.प. यांच्या म्हणण्यानुसार विद्युत पुरवठा करणेसाठी निधी मिळणेची जरुरी असते. तथापि मा. आयोगाने निश्चित काल मर्यादा घालून दिल्यामुळे तक्रारदार यांनी विद्युत पुरवठा लवकर नियमानुसार मिळणेचा अधिकार आहे असे मंचास वाटते.

८) तक्रारदारतर्फे श्री आनंदराव शिंदे यांनी त्यांचे युक्तिवादाचे वेळी नुंकसान भरपाई मिळणेबाबत मागणी सोडून दिलेली आहे.

सबब, वरील विवेचनाच्या आधारे खालील आदेश देणेत येतो.

## आदेश

(१) वि.प. - वितरण कंपनी यांनी तक्रारदार यांना कृषि पंपासाठी विद्युत पुरवठा, या न्याय निर्णयाचे दिनांकापासून तीन महिन्यात सुरु करावा.

(२) तक्रारदार यांची भरपाई मिळणेची मागणी रद्द करणेत येते.

(३)सदर आदेशची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ कलम ८.७ वि.प. यांनी मंचास कळवावे.

(४ ) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

(वि. श. गुळवणी)
अध्यक्ष
ग्राहक तक्रार मंच, कोल्हापूर

(पी.व्ही. खपली)
सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता
ग्राहक तक्रार मंच, कोल्हापूर

श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य
ग्राहक तक्रार मंच, कोल्हापूर

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.